दैनिक

मनोरंजनासह प्रबोधनासाठी...

epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक ४२२ वा ● सोमवार, ता. ६ ऑक्टोबर २०२५ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००

## मदिया सय्यद यांचा प्रधानमंत्री मोदींच्या हस्ते गौरव

### औद्योगिक प्रशिक्षण संस्था परीक्षेत देशात द्वितीय क्रमांक



**नवी दिल्ली । रयत समाचार**

जिद्द, मेहनत आणि आत्मविश्वासाच्या जोरावर ग्रामीण भागातील मुलीही देशपातळीवर झळकू शकतात, हे लातूर जिल्ह्यातील रेणापूर येथील मदिया खदीर सय्यद हिने सिद्ध करून दाखवले. अखिल भारतीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (ITI) परीक्षेत देशात द्वितीय क्रमांक पटकावून तिने महाराष्ट्राचे नाव उज्ज्वल केले आहे. नवी दिल्लीतील विज्ञान भवन येथे आयोजित कौशल्य दीक्षांत समारोहात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते मदियाचा विशेष सत्कार करण्यात आला. या यशस्वी क्षणी संपूर्ण सभागृह टाळ्यांच्या गजरात दुमदुमले. बांधकाम मजूर असलेल्या वडिलांच्या घामाच्या कष्टावर आणि आईच्या सातत्यपूर्ण प्रोत्साहनावर उभी राहिलेली मदिया आज लाखो तरुणांसाठी प्रेरणास्त्रोत ठरली आहे. स्वप्न मोठे असले, तरी त्यासाठी मनापासून परिश्रम केले तर काहीच अशक्य नाही, असे भावनिक शब्द मदियाने गौरवप्रसंगी व्यक्त केले. यावेळी मोदींनी आपल्या भाषणात कौशल्य विकासाचे राष्ट्रीय महत्व अधोरेखित केले. त्यांनी नव्या 'पीएम-सेतू' (PM-SETU) योजनेचा शुभारंभही याच समारंभात केला. या योजनेंतर्गत देशभरातील १,००० पेक्षा अधिक संस्थांचे आधुनिकीकरण करण्यात येणार असून, भारतीय तरुणांना जागतिक कौशल्य बाजाराशी जोडण्याचा प्रयत्न होईल, असे मोदी म्हणाले. ITI संस्था म्हणजे आत्मनिर्भर भारताच्या कार्यशाळा आहेत, असे सांगत मोदींनी मदिया सारख्या विद्यार्थ्यांच्या यशाचा उल्लेख प्रेरणादायी उदाहरण म्हणून केला. लातूर जिल्ह्यातील रेणापूरसारख्या छोट्या गावातून आलेली ही कन्या आज देशाच्या राजधानीत प्रसिध्द झाली असून, तिच्या यशाचा अभिमान संपूर्ण महाराष्ट्राला आहे.

## काटा मारणाऱ्या कारखान्यांची माहिती माझ्याकडे आहे, आता 'बेत पाहतो'

### मुख्यमंत्र्यांनी भरला हाग्यादम



**लोणी । रयत समाचार**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल ता.५ रोजी विखे साखर कारखान्यच्या कार्यक्रमात साखर कारखानदारांना स्पष्ट संदेश देत हाग्यादम भरला. पूरग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी प्रति टन उसामागे ५ रुपये देण्यात यावेत, मात्र ही रक्कम शेतकऱ्यांच्या एफआरपीतून नव्हे तर कारखान्याच्या उत्पन्नातूनच द्यावी, असे सांगितले. फडणवीस म्हणाले, शेतकऱ्यांचा खोटा कळवळा दाखविणारे काही कारखाने ऊसाचे वजन करताना काटा मारून याच शेतकऱ्यांनाच लुटतात. तो पैसा तुम्हाला कसा चालतो? अशा काटा मारणाऱ्या कारखान्यांची माहिती माझ्याकडे आली आहे, आणि त्यांचा आता 'बेत पाहतो'. या फडणवीसी इशाऱ्यामुळे साखर उद्योगात एकप्रकारे खळबळ उडाली असून, शासनाकडून लवकरच काटा तपासणी मोहिमेची शक्यता व्यक्त होत आहे. पूरग्रस्त शेतकऱ्यांच्या पुनर्वसनासाठी कारखान्यांकडून थेट योगदान मिळावे यासाठी सरकारने हा उपक्रम सुरू केला असून, कारखान्यांच्या सामाजिक जबाबदारीचा (CSR) हा खरा कस पाहणारा क्षण ठरू शकतो, अशी चर्चा शेतकरी वर्तुळात सुरू आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांचा इशारा केवळ आर्थिक मदतीपुरता मर्यादित नाही, तर शेतकऱ्यांच्या हक्कावर डल्ला मारणाऱ्यांविरुद्ध कारवाईचा इशारा म्हणून पाहिला जात आहे, की फक्त हाग्यादम ठरणार आहे, हे येणारा काळ ठरविणार.

## कॉ. प्रभावती कुलकर्णी यांचे निधन भारतीय कम्युनिस्ट पक्षाकडून श्रद्धांजली



**शेवगाव । रयत समाचार**

येथील भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे ज्येष्ठ नेते कॉम्रेड शशिकाका कुलकर्णी यांच्या पत्नी प्रभावती काकू कुलकर्णी यांचे दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने पक्ष तसेच सामाजिक चळवळींतून एक आपुलकीची, कार्यकर्त्यांची माया लावणारी व्यक्ती गमावल्याची भावना व्यक्त होत आहे. भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने त्यांना भावपूर्ण आदरांजली अर्पण करण्यात आली असून, सर्व कार्यकर्त्यांनी ''लाल सलाम'' देत त्यांचे स्मरण केले. प्रभावती काकू यांनी आयुष्यभर कॉ. शशिकाका कुलकर्णी यांच्या समाजवादी, कामगार आणि शेतकरी चळवळीतील कार्यात खांद्याला खांदा लावून साथ दिली. त्यांच्या सहृदय व संयमी स्वभावामुळे पक्षातील कार्यकर्त्यांमध्ये त्यांना 'प्रभावती काकू' म्हणून विशेष मान होता. त्यांचा अंत्यविधी सोमवारी ता. ६ ऑक्टोबर रोजी सकाळी ९ वाजता वडूले, ता.शेवगाव, जि. अहमदनगर येथे त्यांच्या राहत्या गावी पार पडणार आहे. भारतीय कम्युनिस्ट पक्ष, कार्यकर्ते, नातेवाईक आणि नागरिकांनी उपस्थित राहून श्रद्धांजली अर्पण करण्याचे आवाहन करण्यात.

## लहान मुलांसाठी कफसिरप वापरावर केंद्र सरकारची नवी मार्गदर्शक तत्त्वे

### दोन वर्षांखालील मुलांना औषधे देऊ नयेत, नैसर्गिक उपायांना प्राधान्य



**नवी दिल्ली । रयत समाचार**

लहान मुलांच्या आरोग्याचे संरक्षण आणि औषधांच्या चुकीच्या वापरावर नियंत्रण ठेवण्यासाठी केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांसाठी महत्त्वपूर्ण मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत.

या नव्या सूचनांनुसार, दोन वर्षांखालील मुलांना कोणतीही कफ सिरप किंवा सर्दीवरील औषधे देऊ नयेत, तर पाच वर्षांखालील मुलांसाठीही ही औषधे केवळ डॉक्टरांच्या सल्ल्यानंतरच वापरावीत, असे स्पष्ट करण्यात आले आहे. मंत्रालयाने म्हटले आहे की, बहुतांश वेळा लहान मुलांमधील कफ व सर्दीचे आजार आपोआप बरे होतात आणि त्यासाठी औषधोपचाराची गरज नसते. त्यामुळे नैसर्गिक उपाय, जसे की पुरेसे पाणी पिणे, विश्रांती घेणे, कोमट पाण्याची वाफ घेणे आणि शरीरातील पाण्याचे संतुलन राखणे यांना प्राधान्य द्यावे, असा सल्ला दिला आहे. औषधे आवश्यक असल्यास, बालरोग तज्ज्ञांनी मुलांची नीट तपासणी करून, योग्य मात्रेत आणि ठराविक कालावधीपुरतीच औषधे द्यावीत, असे निर्देश आहेत. तसेच, एकाच वेळी अनेक औषधे मिसळून देणे टाळावे, असा इशाराही मंत्रालयाने दिला आहे. सर्व आरोग्य केंद्रे, दवाखाने आणि रुग्णालयांनी केवळ मानांकन असलेली, उच्च दर्जाची कफ सिरप्सच खरेदी करावीत, जेणेकरून औषधांची सुरक्षितता आणि परिणामकारकता सुनिश्चित होईल, असेही नमूद करण्यात आले आहे. ही मार्गदर्शक तत्त्वे सर्व राज्ये, केंद्रशासित प्रदेश, जिल्हा आरोग्य विभाग, प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि वैद्यकीय शिक्षण संस्थांमध्ये तातडीने लागू करण्याचे निर्देश मंत्रालयाने दिले आहेत. लहान मुलांच्या आरोग्याशी तडजोड होऊ नये, हेच या सूचनांचे मुख्य उद्दिष्ट आहे, असे मंत्रालयाने स्पष्ट केले.

## पाय जमिनीवर असलेली माणसं

अहमदनगर जिल्ह्यातील टाकळी खातगाव या गावातील दत्तात्रय घोलप गुरुजी. हे खरेतर आजच्या काळातील एक जिवंत प्रेरणास्थान. प्राथमिक शिक्षक म्हणून २००९ साली निवृत्त झालेले हे शिक्षक आजही आपल्या श्रमातून, मातीतून आणि माणुसकीतून जगण्याचे उत्तम उदाहरण घालून देत आहेत. गुरुजींचे मोठे चिरंजीव बंगळुरू येथील प्रसिद्ध बायकॉन फार्मासिटिकल कंपनीत सीनियर मॅनेजर म्हणून कार्यरत आहेत. तर धाकटा मुलगा नगर एमआयडीसीमध्ये दोन ऑटोमोबाईल पार्ट्स बनवणाऱ्या कंपन्या चालवतो. स्वतः गुरुजी आणि त्यांची पत्नी दोघेही पेन्शनधारक. म्हणजेच घरातील आर्थिक परिस्थिती मजबूत, ऐश्वर्यपूर्ण आणि निश्चिंत अशी आहे. पण तरीही दत्तात्रय घोलप गुरुजींनी निवृत्तीनंतरचा काळ फक्त आरामात न घालवता शेतीत रमवला आहे. स्वतःच्या शेतात ते सिताफळ, आवळा आणि मोसंबी अशी विविध फळांची लागवड करतात. ही फळे ते स्थानिक बाजारात तसेच कधी कधी रस्त्यावर बसून स्वतः विकतात. ही त्यांची विक्री म्हणजे केवळ उपजीविका नाही तर मातीतल्या नात्याची, परिश्रमाच्या संस्कारांची आणि जमिनीशी असलेल्या आत्मीयतेची अभिव्यक्ती आहे. हे वय बसून खायचे आहे, पण ज्यांनी काही नसताना स्वतःचे विश्व उभे केले त्यांना श्रमाशिवाय शांतता नाहीच, असे गुरुजींच्या वागण्यातून जाणवते. आजच्या भपकेदार आणि दिखाऊ जीवनशैलीच्या युगातही अशा 'पाय जमिनीवर असलेल्या' व्यक्ती समाजात आहेत, हीच एक मोठी आशा आहे. दत्तात्रय घोलप गुरुजींसारख्या असंख्य जुन्या जाणत्या आणि मातीशी नाळ जोडून राहिलेल्या व्यक्तींना 'रयत समाचार'चा सलाम!



शरद मेढे
९८५०८६८८७२
लोकसंवाद

## राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेत शिववर्धनने रोवला उज्ज्वल यशाचा झेंडा



**छत्रपती संभाजीनगर । रयत समाचार**

राज्यस्तरीय पॅरा स्विमिंग स्पर्धेत शिववर्धन शितल संदीप बकाल पाटील याने उत्कृष्ट कामगिरी करीत १०० मीटर फ्री स्टाइल जलतरण स्पर्धेत कांस्य पदक (Bronze Medal) पटकावले.

ता. ५ ऑक्टोबर २०२५ रोजी सिद्धार्थ स्विमिंग पूल येथे झालेल्या १७व्या राज्यस्तरीय पॅरा जलतरण स्पर्धेत महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांतील स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेत शिववर्धनने उत्तम निर्धार, कष्ट आणि खेळाडूवृत्ती दाखवत यश मिळवले. स्पर्धेच्या शेवटी झालेल्या पदक वितरण समारंभात आयोजकांच्या हस्ते शिववर्धनला प्रमाणपत्र व कांस्य पदक देऊन गौरविण्यात आले. या यशानंतर त्याचे बकाल पाटील, भापकर पाटील, लांडे तसेच वाकळे कुटुंबीय, प्रशिक्षक आणि मित्रपरिवारातून आनंद व्यक्त करण्यात आला.

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात राष्ट्रीय भटके-विमुक्त महिला हक्क परिषद



**पुणे । रयत समाचार**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभाग आणि निर्माण संस्थेच्या संयुक्त विद्यमाने ''राष्ट्रीय भटके विमुक्त महिला हक्क परिषद'' हा महत्त्वपूर्ण उपक्रम पार पडला. भटक्या आणि विमुक्त जमातींमधील महिलांच्या सामाजिक समावेश, हक्क साक्षरता आणि सशक्तीकरणासाठी कार्यरत असलेल्या निर्माण संस्थेच्या या उपक्रमाचे उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले. निर्माण संस्था २००६ पासून शिक्षण, आरोग्य, उपजीविका, महिला सुरक्षा, न्याय व कौशल्य विकास या विविध क्षेत्रांमध्ये उपेक्षित आणि वंचित समाजघटकांमध्ये उल्लेखनीय कार्य करत आहे. महिलांना समाजात सक्रिय भूमिका बजावण्यासाठी प्रेरणा देण्याच्या उद्देशाने ही परिषद आयोजित करण्यात आली होती. या कार्यक्रमास राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा श्रीमती विजयाताई रहाटकर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, राष्ट्रीय भटके विमुक्त जाती-जमाती आयोगाचे अध्यक्ष दादा ईदाते, निर्माण फाउंडेशनच्या संस्थापक अध्यक्षा वैशाली भांडवलकर, बाळकृष्ण रेणके, हरिष नवले, डॉ. संजय कोळेकर आदी मान्यवर उपस्थित होते. परिषदेच्या माध्यमातून भटक्या आणि विमुक्त समाजातील महिलांनी शिक्षण, रोजगार, आणि न्यायप्रविष्टता याबाबतच्या संधी व आव्हानांवर चर्चा केली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल निर्माण संस्थेचे आभार मानण्यात आले. सशक्त महिला सशक्त समाज, हा संदेश देत परिषदेचा समारोप झाला.



## काँग्रेसने भाजपला 'होलसेल' पद्धतीने आमदार पुरविले- केजरीवाल

**गोवा । रयत समाचार**

गोव्यातील आगामी विधानसभा निवडणुकीसाठी आम आदमी पार्टी (AAP) ने काँग्रेससोबत कोणतीही आघाडी न करण्याचा निर्णय घेतला आहे. पक्षाचे राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल यांनी याबाबत स्पष्टपणे म्हटले की, गोव्यातील लोकांना भ्रष्टाचार आणि वाईट प्रशासनापासून मुक्त करण्यासाठी AAP स्वतंत्रपणे निवडणुका लढवेल. केजरीवाल यांनी काँग्रेसवर थेट आरोप करत सांगितले की, ''काँग्रेसने भाजपला 'होलसेल' पद्धतीने आमदार पुरवले आहेत, त्यामुळे पक्षाच्या धोरणावर लोकांचा विश्वास ढासळला आहे.'' त्यांनी गोव्यातील राजकीय व्यवस्थेतील सडलेले आणि भ्रष्ट स्वरूप उघड करण्यावर भर दिला. AAP ने गोव्यातील मायेम मतदारसंघात कार्यालयही उघडले असून, पक्ष स्वतंत्रपणे निवडणुकीसाठी सज्ज आहे. केजरीवाल यांनी दिल्ली आणि पंजाबमधील AAP प्रशासनाचे उदाहरण देत, गोव्यातही लोकाभिमुख आणि पारदर्शक सरकार देण्याचे आश्वासन दिले आहे. राजकारण तज्ज्ञांच्या मते, केजरीवाल यांच्या या घोषणेमुळे गोव्यातील आगामी विधानसभा निवडणुकीत , काँग्रेस आणि भाजप यांच्यातील स्पर्धा अधिक तीव्र होणार आहे.




## प्रत्येक जिल्ह्यात हॉस्पिटल, मेडिकल कॉलेजची स्थापना करणार- सिद्धरामय्या

**बेळगाव । श्रीकांत काकतीकर**

राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात एक मेडिकल कॉलेज, हॉस्पिटल आणि सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल उपलब्ध करून देण्याची सरकारची योजना आहे. यापैकी २२ जिल्ह्यांमध्ये वैद्यकीय महाविद्यालये सुरू झाली असून, उर्वरित जिल्ह्यांमध्येही लवकरच ती सुरू करण्यात येतील, अशी घोषणा मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी केली.

बेळगाव येथील सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल इमारतीचे बांधकाम, फॅमिली डॉक्टरांसाठी निवासी वसतिगृह, स्मार्ट सिटी अंतर्गत बांधण्यात आलेल्या सिटी बस स्टँडचे बांधकाम, राणी चेन्नम्मा विद्यापीठाच्या पीएम-उषा इमारतीचे बांधकाम तसेच महामार्गापासून विद्यापीठापर्यंतच्या रस्त्याच्या बांधकामाचे भूमिपूजन मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्या हस्ते शुक्रवार, ता. ४ ऑक्टोबर रोजी पार पडले. यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, विविध कारणांमुळे मंद गतीने सुरू असलेले रुग्णालय आता आवश्यक सुविधांसह सुरू करण्यात आले आहे. डॉक्टर आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांची टप्प्याटप्प्याने भरती केली जाणार आहे. तसेच केएलई संघटनेतील डॉक्टरांनी रुग्णसेवेत दिलेल्या मोफत योगदानाबद्दल त्यांनी आभार मानले. मुख्यमंत्री म्हणाले की, ''सरकारचे प्राधान्य गरीब, कनिष्ठ वर्गातील आणि असमानतेमुळे वंचित राहिलेल्या लोकांना चांगल्या सुविधा उपलब्ध करून देणे आहे.'' बुद्ध, बसव, आंबेडकर आणि गांधीजी यांनी समान समाज निर्माण करण्यासाठी दिलेल्या विचारांचा आदर्श ठेवून सरकार काम करत असल्याचे त्यांनी नमूद केले. असमानता दूर करण्यासाठी सरकारकडून अनेक योजना राबविल्या जात असून, गरिबांना सर्वोत्तम वैद्यकीय सेवा देणे ही सरकारची जबाबदारी असल्याचे ते म्हणाले. मुख्यमंत्री मदत निधीतून लाखो लोकांना मदत करण्यात येत असून, अशा सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलच्या स्थापनेद्वारे मोफत आणि गुणवत्तापूर्ण उपचार मिळत आहेत, असेही मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी सांगितले.



## नेताजीराव जाधव अमृत महोत्सवात राहणार शरद पवारांची उपस्थिती

**बेळगाव । श्रीकांत काकतीकर**

बेळगावच्या सामाजिक, सहकार आणि राजकीय क्षेत्रात गेली अनेक वर्षे कार्यरत असलेले महाराष्ट्र एकीकरण समितीचे ज्येष्ठ सदस्य व माजी नगरसेवक श्री नेताजीराव जाधव यांच्या अमृत महोत्सवाचे आयोजन येत्या ता. १५ ऑक्टोबर २०२५ रोजी करण्यात आले आहे.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र राज्याचे माजी अर्थमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे माजी अध्यक्ष शरदचंद्र पवार तसेच जयंत पाटील हे उपस्थित राहणार आहेत.अमृत महोत्सव समितीच्या वतीने या कार्यक्रमाचे निमंत्रण देण्यासाठी स्वागत समितीचे अध्यक्ष प्रकाश मरगाळे, चिटणीस प्रभाकर भागोजी, सदस्य शिवाजीराव हंगिरकर, श्रीधर (बापू) जाधव आणि विजय जाधव यांनी इस्लामपूर येथे जयंत पाटील यांची भेट घेतली. या वेळी पाटील यांनी कार्यक्रमास उपस्थित राहण्याची मान्यता दिली असल्याचे समितीच्या वतीने सांगण्यात आले.

धोकादायक बससेवा : प्रवाशांच्या जीवाशी खेळ

# अहिल्यानगर महानगरपालिका बसचा 'हिट अँड रन' खेळ थोडक्यात संपला

**अहमदनगर । रयत समाचार**

अहिल्यानगर महानगरपालिकेच्या बससेवेतील निष्काळजीपणाचा आणखी एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. १६ ६३२५ क्रमांकाची मनपाची बस ता.४ ऑक्टोबर रोजी संध्याकाळी अंदाजे ५:३० च्या दरम्यान प्रेमदान चौकातून सुसाट सुटत मनमाड रोडने भरधाव वेगाने जात असताना पेताड चालकाने नियंत्रण गमावल्याने 'हिट अँड रन' होण्याची शक्यता निर्माण झाली होती. या दरम्यान अनेक महिला आणि पुरुष वाहनचालकांना आपल्या जीवावर उदार होऊन रस्त्याच्या कडेला गाडी थांबवावी लागली. सुदैवाने प्रसंगाचे गांभीर्य ओळखून







सामाजिक कार्यकर्ते हेमंत भुतकर आणि तोफखाना पोलीस ठाण्याचे कॉन्स्टेबल यांनी तत्परतेने प्रतिसाद देत सारडा कॉलेजसमोर आपले वाहन आडवे लावून बस थांबवली. यानंतर त्यांनी चालकाला ताब्यात घेत तोफखाना पोलीस ठाण्यात कारवाईसाठी नेले. बसमधील प्रवाशांमध्ये मोठे भय पसरले होती. विशेषतः अनेक महिला दुचाकीस्वारांनी दिलासा व्यक्त करत सांगितले, आम्ही थोडक्यात वाचलो! नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून, मनपा प्रशासनाने या बेफिकीर बसचालकावर कठोर कारवाई करावी अशी मागणी शहरवासीयांकडून होत आहे.

> **महानगरपालिकेच्या बससेवेवरील देखरेख आणि चालक प्रशिक्षणाची गरज अधिक तीव्रतेने जाणवत आहे. सार्वजनिक वाहतुकीचा विश्वास परत मिळवायचा असेल, तर जबाबदार प्रशासनिक पावले उचलणे अत्यावश्यक आहे.**
> – विजय केदारे

# सेनापती बापट साहित्य संमेलन संयोजन समिती जाहीर

## अध्यक्षपदी सचिन चोभे, कार्याध्यक्षपदी सिद्धनाथ मेटे यांची निवड

**अहमदनगर । रयत समाचार**

स्वातंत्र्यसैनिक सेनापती बापट साहित्य संमेलन येत्या नोव्हेंबर महिन्यात आयोजित करण्यात येणार आहे. या संमेलनाचे नियोजन मराठी भाषा विभाग आणि महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. संमेलनाच्या संयोजन समितीच्या अध्यक्षपदी लेखक सचिन मोहन चोभे, तर कार्याध्यक्षपदी सिद्धनाथ मेटे महाराज, तसेच समन्वयक म्हणून लेखक रामदास कोतकर यांची निवड करण्यात आली. रविवार, ता. ५ ऑक्टोबर २०२५ रोजी झालेल्या बैठकीत संमेलनाची प्राथमिक रूपरेषा निश्चित करण्यात आली. या बैठकीबाबतची माहिती आयोजक संस्था 'आत्मनिर्धार फाउंडेशन'चे अध्यक्ष महादेव गवळी यांनी दिली. त्यांनी सांगितले की, आज झालेल्या तिसऱ्या बैठकीत विविध मुद्द्यांवर चर्चा झाली. काही सदस्य प्रत्यक्ष उपस्थित होते, तर काहींनी व्हिडिओ कॉलद्वारे सहभाग नोंदविला. बैठकीत महिला, नवसाहित्यिक, दिव्यांग आणि वंचित घटकांना संमेलनात सहभागी करून घेण्याचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला. रमेश आमले यांनी संयोजन समितीचा ठराव मांडला, तर आनंदा साळवे यांनी त्यास अनुमोदन दिले.







संयोजन समितीच्या सहसमन्वयकपदी कवयित्री स्वाती पाटील यांची निवड करण्यात आली. तसेच निमंत्रण समितीत शब्बीरभाई शेख, हेमलता पाटील, रमेश आमले, सुभाष सोनवणे, अमोल इथापे, शेख रज्जाक आणि ऋतिक लोंढे यांचा समावेश आहे. व्यवस्थापन समितीत संदीप गेरंगे, भानुदास कोतकर, वसंत कर्डीले, नामदेव लोंढे, प्रा. शरद दारकुंडे, अॅड. सचिन चंदनशिव, मच्छिंद्रनाथ म्हस्के, प्रा. अमोल सायंबर, अजिंक्य काटकर, मेहेक वाणी, राजेंद्र खुंटाळे आणि देविदास बुधवंत यांनी संमेलनाच्या यशस्वी आयोजनाची जबाबदारी स्वीकारली. संमेलनाचे प्रसिद्धीप्रमुख म्हणून अॅड. राहुल ठाणगे आणि मकरंद घोडके कार्यरत राहतील. संमेलनाची नेमकी तारीख व संमेलनाध्यक्षांची घोषणा लवकरच करण्यात येईल, अशी माहिती महादेव गवळी यांनी दिली.





# संजय घुले यांच्या मातु:श्री विमलबाई घुले यांचे निधन

**अहमदनगर । रयत समाचार**


अहमदनगर शहर सहकारी बँकेचे संचालक संजय विठ्ठलराव घुले यांच्या मातोश्री व जिल्हा हमाल पंचायतचे अध्यक्ष अविनाश घुले यांच्या वहिनी श्रीमती विमलबाई विठलराव घुले यांचे शनिवार ता. ०४ ऑक्टोबर २०२५ रोजी दुःखद निधन झाले,

मृत्यूसमयी त्यांचे ८९ वय होते .त्यांच्या मागे एक मुलगा, एक मुलगी, सून, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्यावर नालेगाव येथील अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या निधनाबद्दल सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

# मानवसेवेतील अद्वितीय योगदान संत निरंकारी मिशनचा विशेष सन्मान

**अहमदनगर । रयत समाचार**

गांधी जयंतीनिमित्त श्रीनगर येथे गांधी ग्लोबल फॅमिलीच्या वतीने आयोजित कार्यक्रमात संत निरंकारी मिशनचा मानवसेवेतील अद्वितीय योगदानाबद्दल विशेष सन्मान प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमाची अध्यक्षता पद्मश्री डॉ. एस. पी. वर्मा यांनी केली होती. कार्यक्रमाला विविध प्रतिष्ठित संस्थांचा सहभाग लाभला. ''मानवाला मानव प्रिय असावा, एकमेकांचा आधार बनावा'' या मूलभूत तत्त्वावर कार्यरत असलेले संत निरंकारी मिशन सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली समाजकल्याणासाठी निःस्वार्थ सेवा बजावत आहे.



'संपूर्ण विश्व एक कुटुंब' या संकल्पनेला मूर्त रूप देण्यासाठी मिशनने केलेले प्रयत्न उल्लेखनीय मानले जातात. मिशनच्या सामाजिक शाखा 'संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशन'द्वारे पर्यावरण संरक्षण, आरोग्य सेवा, रक्तदान, स्वच्छता अभियान, आपत्ती निवारण यांसारखे विविध उपक्रम देशभर राबवले जात आहेत. जम्मू-कश्मीरमध्ये आलेल्या पूर, ढगफुटी यांसारख्या नैसर्गिक आपत्तींमध्ये तसेच 'ऑपरेशन सिंदूर'च्या काळात मिशनने तत्परतेने मदतकार्य करत अन्नधान्य, औषधे व आवश्यक साहित्य प्रभावित कुटुंबांपर्यंत पोहोचवले. या सेवेची शासनासह समाजातील विविध घटकांनी वेळोवेळी प्रशंसा केली आहे. श्रीनगर येथील शेर-ए-कश्मीर आंतरराष्ट्रीय संमेलन केंद्रात झालेल्या भव्य समारंभात जम्मू-काश्मीरचे उपराज्यपाल मनोज सिन्हा यांच्या हस्ते संत निरंकारी मंडळाचे सचिव जोगिंदर सुखीजा यांना हा विशेष सन्मान प्रदान करण्यात आला. सन्मान स्वीकारताना सुखीजा म्हणाले की, ''संत निरंकारी मिशन सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज यांच्या प्रेरणेने सदैव समाजकल्याण आणि मानव सेवेप्रति कटिबद्ध आहे. आमचे प्रत्येक कार्य सेवा, समर्पण आणि एकत्व या सिद्धांतांवर आधारित आहे. नैसर्गिक आपत्तीमधील मदतकार्य असो वा रक्तदानासारख्या जीवनदायी उपक्रमांतील सहभाग असो, मिशन नेहमीच अग्रेसर राहिले आहे. आमचा उद्देश प्रत्येक मानवापर्यंत प्रेम, शांती आणि ऐकतेचा संदेश पोहोचवणे हा आहे.'' गांधी जयंतीच्या या स्मरणीय प्रसंगी संत निरंकारी मिशनला मिळालेला सन्मान ही त्यांच्या निःस्वार्थ सेवाभावना, समर्पण आणि विश्वबंधुत्वाच्या आदर्शाचे प्रतीक असल्याचे सर्वमान्य झाले.

# मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळास निधी द्या– राम रहीम प्रतिष्ठानची मागणी

**अहमदनगर । आबीद खान**

मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळामार्फत अहमदनगर जिल्ह्याला निधी उपलब्ध करून देण्यात यावा, अशी मागणी राम-रहीम बहुउद्देशीय सामाजिक प्रतिष्ठानाचे अध्यक्ष व सामाजिक कार्यकर्ते माजी सैनिक रफिक शेख यांनी केली.

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पारनेर दौऱ्यादरम्यान मेजर रफिक शेख यांनी त्यांची भेट घेऊन ही मागणी केली. यावेळी पारनेरचे आमदार काशिनाथ दाते, जिल्हाधिकारी पंकज आशिया, पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे, माजी जिल्हा परिषद सदस्य व भाजप तालुकाध्यक्ष वसंत चेडे, दिलीप दाते, नियाज राजे, रियाज राजे, किरण कुबडे, इमरान शेख, आवेज राजे, रेहान राजे आदी मान्यवर उपस्थित होते.

या मागणीवर तात्काळ प्रतिसाद देत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी संबंधित निधी उपलब्ध करून देण्यासाठी आदेश दिले. ''माझ्याकडून कोणताही उशीर होणार नाही,'' असेही त्यांनी स्पष्ट केले.दरम्यान, मेजर रफिक शेख यांनी पवार यांना दिलेल्या निवेदनात सांगितले की, सन १९७१ मध्ये सैनिकांना सिलीग येथे जागा वाटप करण्यात आली होती. मात्र गेल्या ५५ वर्षांपासून त्या जागेचा ताबा माजी सैनिकांना मिळालेला नाही. त्या ठिकाणी काही लोकांनी अतिक्रमण केले असून, या प्रकरणात तातडीने कारवाई करावी अशी मागणी करण्यात आली. यावर उपमुख्यमंत्री पवार यांनी जिल्हाधिकाऱ्यांना तात्काळ कारवाईचे आदेश दिले असल्याचेही रफिक शेख (मेजर) यांनी सांगितले.

# डॉ. विखे अभियांत्रिकीत 'डीप लर्निंग विथ पायथन' विषयावर कार्यशाळा



**अहमदनगर । विजय मते**

विळद घाट येथील डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग येथे डीप लर्निंग विथ पायथन प्रोग्रॅमिंग या विषयावर तीन दिवसीय हॅन्ड्स-ऑन ट्रेनिंग कार्यशाळा नुकतीच संपन्न झाली.ही कार्यशाळा माहिती तंत्रज्ञान विभाग आणि संगणक शास्त्र व डिझाईन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली होती. कार्यशाळेचे मार्गदर्शन पुणे येथील मितू टेक्नॉलॉजीजचे संस्थापक तुषार कुटे यांनी केले. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना डीप लर्निंग टेक्नॉलॉजीची मूलभूत माहिती, डीप न्यूरल नेटवर्क्सची रचना व प्रशिक्षण, तसेच सीएनएन आणि डीप न्यूरल नेटवर्क्समधील प्रगत संकल्पनांची सखोल माहिती देण्यात आली. यामध्ये टेन्सरफ्लो, केरस, पायटॉर्च आदी पॅकेजेसचा अभ्यास, इमेज क्लासिफिकेशन, ऑटोएन्कोडर वापरून ॲनोमली डिटेक्शन, आरएनएन व सीएनएन मॉडेल्सची बांधणी तसेच ट्रान्सफर लर्निंग वापरून ऑब्जेक्ट डिटेक्शन यांसारख्या विषयांवर प्रत्यक्ष प्रात्यक्षिके घेण्यात आली. कार्यशाळेचे समन्वयक म्हणून प्रा. प्राची मोरे व प्रा. प्राजक्ता डोलारे यांनी काम पाहिले. माहिती तंत्रज्ञान विभाग प्रमुख डॉ. डी. ए. विधाते, कॉम्प्युटर सायन्स विभाग प्रमुख डॉ. आर. एस. तांबे, प्राचार्य डॉ. आर. आर. नवथर तसेच तांत्रिक संचालक प्रा. सुनील कल्हापुरे यांचे मार्गदर्शन लाभले. या कार्यशाळेत एकूण १०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. प्रत्येक सहभागी विद्यार्थ्याला प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले तसेच त्यांनी व्यक्तिगत प्रकल्प यशस्वीरीत्या पूर्ण केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना आणि संशोधकांना आधुनिक डीप लर्निंग तंत्रज्ञानाची प्रत्यक्ष अनुभवातून ओळख झाली. या कार्यशाळेसाठी डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशनचे डायरेक्टर (टेक्निकल) प्रा. सुनील कल्हापुरे, सेक्रेटरी जनरल डॉ. पी. एम. गायकवाड, सीईओ डॉ. सुजय विखे पाटील तसेच जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी विशेष कौतुक केले.

रयत समाचार Classified छोटी जाहिरात

छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक




निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

हॉटेल भाड्याने देणे
नगर-सोलापूर हायवेपासून पाच मिनिटांच्या अंतरावर असणाऱ्या कानडेमळा येथील सारसनगर चौकातील सुस्थितीत असणारे हॉटेल भाड्याने चालविण्यास देणे आहे. किमान ३० ते ५० लोक एकावेळी बसतील अशी पीओपी आणि लाईट फिटिंगसह बैठक व्यवस्था, व्हेज-नॉन, व्हेजसाठी स्वतंत्र किचन, सर्व किचन साहित्य टेबल, सोफे, पाण्याची व्यवस्था इत्यादीसह देणे आहे.
- संपर्क -
९०११११३७००

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा

हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ,** 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी – गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफिसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)

# महेंद्र गायकवाडने गाजवले मैदान, पटकावली लाखोंची बक्षिसे

## पाथर्डीत जंगी हगामा उत्साहात संपन्न



**पाथर्डी । नितीन गटाणी**

वडार समाज बांधवांच्या पुढाकारातून पाथर्डीसारख्या ग्रामीण भागात सलग २७ वर्षांपासून अखंडपणे होत असलेला कुस्त्यांचा जंगी हंगामा ही समाजासाठी भूषणावह बाब आहे. आगामी काळातही ही परंपरा कार्यकर्त्यांनी सातत्याने जपावी, यासाठी पूर्ण सहकार्य करू, असे प्रतिपादन वडार संघटनेचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष भरत विटकर यांनी केले. नवरात्रोत्सवानिमित्त दसऱ्याच्या दुसऱ्या दिवशी शहरातील बैल बाजारतळ येथे २७ वा कुस्त्यांचा जंगी हगामा अतिशय उत्साही आणि रोमहर्षक वातावरणात पार पडला.

हगाम्याचा शुभारंभ विटकर यांच्या हस्ते झाला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून माजी नगरसेवक तुकाराम पवार, रवींद्र भोरू म्हस्के, मच्छिंद्र पवार, माजी नगराध्यक्ष सुभाष घोडके, अभय आव्हाड, बाळासाहेब ताठे, माजी नगरसेवक बंडू बोरुडे, चांद मनियार, मुकुंद गर्जे आदी मान्यवर उपस्थित होते.बैल बाजारतळ येथे कुस्त्यांसाठी भव्य आखाडा उभारण्यात आला होता. प्रमुख पाहुण्यांसाठी भव्य मंच, प्रेक्षकांसाठी बैठक व्यवस्था तसेच तीन मोठ्या अत्याधुनिक स्क्रीनची सोय करण्यात आली होती. पंढरपूर येथील धनाजी मदने यांच्या जोशपूर्ण सूत्रसंचालनाने संपूर्ण वातावरण भारावून गेले. कुस्त्या पाहण्यासाठी तालुका व परिसरातील हजारो नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.पहिली मानाची कुस्ती सोलापूरचा महेंद्र गायकवाड आणि इराणचा पैलवान रिझा इराण यांच्यात रंगली. गायकवाडने रिझाला चितपट करत तब्बल ₹५ लाख ५१ हजारांचे पारितोषिक पटकावले. दुसऱ्या क्रमांकाची कुस्ती श्रीनिवास पाथरूड व हनुमंत पुरी यांच्यात झाली. यात पाथरूडने विजय मिळवत ₹४ लाख ५१ हजारांचे पारितोषिक मिळवले. तिसऱ्या क्रमांकाची कुस्ती गौतम शिंदे व बाळू बहिरवाल यांच्यात झाली. यात शिंदेने प्रतिस्पर्ध्याला पराभूत करत ₹३ लाख ५१ हजारांचे पारितोषिक जिंकले. याशिवाय इतर शेकडो कुस्त्यांसाठी उत्तेजनार्थ लाखो रुपयांची बक्षिसे वाटप करण्यात आली. हगामा यशस्वी होण्यासाठी सुभाष पवार, लहू पवार, महेश पवार, कैलास पवार, अंबादास आरोळे, संदीप पवार, दत्तू पवार, संग्राम पवार आदींनी परिश्रम घेतले.



# ऊसतोडणी महिला कामगारांसाठी आरोग्य शिबिर; उचल फाउंडेशनचा उपक्रम

**शेवगाव । नरहरी शहाणे**

मुंगूसवाडे (ता. शेवगाव) येथे उचल फाउंडेशनतर्फे ऊसतोडणी कामगार महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी व औषधोपचार शिबिर घेण्यात आले. गेल्या सात वर्षांपासून ही संस्था ऊसतोडणी कामगारांसाठी विविध सामाजिक उपक्रम राबवत असून, दरवर्षी ता. ८ मार्च रोजी जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून शिबिराचे आयोजन केले जाते. यावेळी प्रथमच ऊसतोडणीपूर्वी शिबिर घेण्यात आले असून, हंगामानंतर पुन्हा तपासणी करून महिलांच्या आरोग्यावर होणाऱ्या परिणामांचा अहवाल तयार करण्यात येणार आहे. महाराष्ट्रात अशा प्रकारचा अहवाल तयार करणारी उचल फाउंडेशन ही पहिली संस्था ठरणार आहे. या शिबिरात ७० महिलांचे रक्त तपासणीसह शंभराहून अधिक महिलांच्या वैद्यकीय तपासण्या करण्यात आल्या. स्नेहालय संस्थेकडून फिरता दवाखाना उपलब्ध करून देण्यात आला. तपासणीत महिलांचा कमी एच.बी., कंबर व पाठदुखी, तसेच गर्भवती महिलांच्या समस्या प्रकर्षाने दिसून आल्या. काही महिला मुलांसह ऊसतोडणीस जाणार असल्याचेही स्पष्ट झाले. डॉ. मनीषा लड्डा यांनी तपासण्या पार पाडल्या तर डॉ. साक्षी नागरगोजे (खरवंडी प्राथमिक आरोग्य केंद्र) व त्यांचे सहकारीही उपस्थित होते. पुरुष ऊसतोड कामगारांचीही तपासणी करण्यात आली. या उपक्रमासाठी उचल फाउंडेशनच्या सुजाता खेडकर, गणेश केदार, मोतीलाल बंसवाल, प्रमोद दळवी, तसेच स्व. गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठान (मुंगूसवाडे) कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# विकसित भारतासाठी पंचपरिवर्तन उपक्रम राबविणार– सचिन राऊत

## राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पथसंचलन



**पाथर्डी । नितिन गटाणी**

हिंदुस्थान हा देश आज विकसित आणि जागतिक महासत्तेकडे वाटचाल करीत असताना, ''विकसित भारत – सशक्त भारत'' घडवण्यासाठी बलशाली राष्ट्र उभारणी आवश्यक आहे. या दृष्टीने राष्ट्रीय स्वयंसेवक संघ सामाजिक समरसता, पर्यावरण, नागरिक कर्तव्य, कुटुंब प्रबोधन आणि स्वबोध या पंचसूत्रांवर आधारित 'पंचपरिवर्तन' उपक्रम राबवणार आहे, असे प्रतिपादन संघाच्या समरसता विभागाचे प्रांत संयोजक सचिन राऊत यांनी केले. संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त पाथर्डी शहरात संघ गणवेशातील सघोष पथसंचलन, शस्त्रपूजन आणि विजयादशमी उत्सव पार पडला. या कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून सचिन राऊत बोलत होते. यावेळी व्यासपीठावर ज्येष्ठ क्रीडा प्रशिक्षक प्रा. डॉ. विजय देशमुख आणि तालुका संघचालक अरविंद पारगावकर उपस्थित होते. राऊत पुढे म्हणाले, ''संघ आज जगभरातील सुमारे ६० पेक्षा जास्त देशांमध्ये शताब्दी वर्ष विविध उपक्रमांद्वारे साजरे करीत आहे. मागील शंभर वर्षांच्या प्रवासात संघाचा विस्तार मोठ्या प्रमाणावर झाला असून आज तो समाजातील प्रत्येक क्षेत्रात लोककल्याणकारी आणि पथदर्शी कार्य करत आहे.'' ते पुढे म्हणाले की, या शताब्दी वर्षात संघ पंचसूत्री कार्यक्रमावर अधिक भर देत कार्यरत आहे. बलशाली हिंदुस्थानाच्या राष्ट्रउभारणीत संघाचे योगदान कोणीही नाकारू शकत नाही. स्वयंसेवकांनी समाजात जाऊन जातीभेद, वर्णभेद विसरायला लावून समरसतेचा संदेश द्यावा. संविधान निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीही संघ शाखेला भेट देऊन कार्याचे कौतुक केले होते. ''कुटुंब व्यवस्था टिकली तरच भारतीय संस्कृती टिकेल,'' असे सांगून राऊत यांनी पुढे म्हटले की, परकीय सांस्कृतिक आक्रमण रोखण्यासाठी आपल्या पराक्रमी इतिहास, आध्यात्मिक शक्ती आणि भारतीय संस्कारांचे महत्त्व जनमानसात पोहोचवणे गरजेचे आहे. स्वदेशी आणि स्वबोध यांचा प्रचार होणे आवश्यक आहे. देश प्रगतीपथावर ठेवण्यासाठी आणि बलशाली बनवण्यासाठी प्रत्येकाने व्यक्तिगत स्वार्थ बाजूला ठेवून राष्ट्रीय कर्तव्य समजून घ्यावे, असे आवाहन त्यांनी केले. वीर सावरकर मैदानातून ध्वजप्रणाम करून सुरू झालेल्या या शिस्तबद्ध संचलनात सुमारे २५० स्वयंसेवक सहभागी झाले होते. शहरातील नागरिकांनी चौकाचौकात फटाक्यांची आतषबाजी, तोफांची सलामी आणि पुष्पवृष्टी करून स्वयंसेवकांचे स्वागत केले. महिलांनी रांगोळ्या काढून सडासंमार्जन केले होते. संचलन पाहण्यासाठी नागरिकांची रस्त्याच्या दुतर्फा मोठी गर्दी उसळली होती. यानंतर झालेल्या उत्सवाला जिल्हा सहकार्यवाह अमोल भंडारी, धर्मजागरण विभागाचे जिल्हा सहसंयोजक नानासाहेब पालवे, संतसंपर्क विभाग प्रमुख अनिल रामदासी, तसेच राष्ट्र सेविका समितीच्या सदस्यांसह मातृशक्ती व विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तालुका कार्यवाह शैलेश शिरसाठ यांनी केले. घोष संचालन तेजस पटवा, शाखा संचालन चैतन्य पवार यांनी केले, तर आभार प्रदर्शन पंकज राठी यांनी मानले. संचलनादरम्यान पोलीस उपनिरीक्षक विलास जाधव आणि कर्मचारी मधुकर कोकाटे, संदीप कळमकर, सतीश भताने, मच्छिंद्र बांगर व अशोक बुधवंत यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

# जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त जलद चालणे स्पर्धा उत्साहात

## समता पतसंस्था, समता इंटरनॅशनल स्कूल व ज्येष्ठ नागरिक सेवा मंचचा उपक्रम



**कोपरगाव । किसन पवार**

जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त समता नागरी सहकारी पतसंस्था, समता इंटरनॅशनल स्कूल आणि कोपरगाव ज्येष्ठ नागरिक सेवा मंच यांच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठांसाठी जलद चालणे स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक ते समता पतसंस्थेचे मुख्य कार्यालय या मार्गावर ही स्पर्धा उत्साहात व खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.

या स्पर्धेत ६५ ते ७५ आणि ७५ वर्षांवरील अशा दोन गटांत विभागणी करून एकूण १८० ज्येष्ठ महिला व पुरुष सहभागी झाले. स्पर्धेचे उद्घाटन समता पतसंस्थेचे चेअरमन काका कोयटे, व्हा. चेअरमन अरविंद पटेल, ज्येष्ठ नागरिक सेवा मंचचे कार्याध्यक्ष विजय बंब, सचिव उत्तमभाई शहा, तसेच ज्येष्ठ महिला समिती अध्यक्षा रजनीताई गुजराथी यांच्या हस्ते करण्यात आले. बक्षीस वितरण समारंभ समता सहकार सभागृहात पार पडला. ९८ वर्षीय ज्येष्ठ गोपीनाथ महाले यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमास ९७ वर्षीय दत्तात्रय कंगले, ९६ वर्षीय दशरथ वहाडणे, शोभा ठोळे व रंजना आढाव प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या वेळी स्व. भागचंद माणिकचंद ठोळे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ विजेत्यांना ट्रॉफी प्रदान करण्यात आली.

**स्पर्धेतील विजेते पुढीलप्रमाणे:** पुरुष गट (६५ ते ७५ वर्षे) : वसंत भावसार (प्रथम), अशोक चौधरी (द्वितीय), प्रदीप पदे (तृतीय) पुरुष गट (७५ वर्षांवरील) : दिनकर झावरे (प्रथम), चांगदेव घुमरे (द्वितीय), छबूराव नजन (तृतीय)

**महिला गट (६५ वर्षांवरील) :** शशिकला देशमुख (प्रथम), लहानुबाई खंडिझोड (द्वितीय), हिराबाई दवंगे (तृतीय) प्रत्येक गटातील आठ सहभागींची उत्तेजनार्थ बक्षिसांसाठी निवड करण्यात आली.

> **'जलद चालणे हा व्यायामाचा प्रकार आरोग्य सुधारतो, सुसंवाद वाढवतो आणि ज्येष्ठांमध्ये नवचैतन्य आणतो. जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त झालेल्या या स्पर्धे त ज्येष्ठांचा उत्साह पाहून आम्हाला अभिमान वाटतो. त्यांचा सहभाग हेच या उपक्रमाचे खरे यश आहे.**
>
> **काका कोयटे,**
> चेअरमन,
> समता नागरी सहकारी पतसंस्था

विजेत्यांच्यावतीने मनोगत व्यक्त करताना दिनकर झावरे म्हणाले, ''समता पतसंस्था नेहमीच ज्येष्ठांच्या हितासाठी उपक्रम राबवते. ठेवींवरील आकर्षक व्याजदरासोबत आरोग्य आणि आनंदी जीवनासाठी विविध व्याख्याने घेतली जातात. जलद चालणे स्पर्धेमुळे आम्हाला व्यायामाची सवय लागते आणि आरोग्य सुधारते. भविष्यात अशा स्पर्धा नियमित व्हाव्यात, अशी आमची अपेक्षा आहे.'' कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. विलास आचारी यांनी केले. सूत्रसंचालन समता इंटरनॅशनल स्कूलचे प्राचार्य समीर अत्तार यांनी, तर आभार प्रदर्शन ठेव विभाग प्रमुख संजय पारखे यांनी मानले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी समता पतसंस्था, समता इंटरनॅशनल स्कूल व ज्येष्ठ नागरिक सेवा मंचचे पदाधिकारी, अधिकारी आणि कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# विजयादशमीनिमित्त राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पथसंचलन



**नेवासा । रयत समाचार**

विजयादशमीचे औचित्य साधून राष्ट्रीय स्वयंसेवक संघातर्फे सोनई शहरात शनिवारी पथसंचलनाचे आयोजन करण्यात आले. स्वयंसेवकांचे शिस्तबद्ध संचलन व देशभक्तीपूर्ण घोषवाक्यांनी परिसर दुमदुमला. नागरिकांना संघाच्या गणवेशातील स्वयंसेवकांना दिल्या जाणाऱ्या प्रशिक्षणाची आणि देशभक्तीची झलक पाहायला मिळाली. संचलनादरम्यान शस्त्रपूजन करण्यात आले. स्वयंसेवकांच्या स्वागतासाठी महिला व नागरिकांनी ठिकठिकाणी पुष्पवर्षाव केला. काही ठिकाणी जेसिबीच्या सहाय्यानेही पुष्पवृष्टी करण्यात आली. मार्गावरील छत्रपती शिवाजी महाराज चौक, स्वामी विवेकानंद चौक, छत्रपती संभाजी चौक, महावीर पेठ, हलवाई गल्ली, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, बसस्थानक, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा स्मारक, राहुरी रोड व श्री रेणुका माता कमान येथे संचलनाचे स्वागत करण्यात आले. संचलनाची सुरुवात सोनई महादेव मंदिरातून झाली व त्याच ठिकाणी सांगता झाली. तालुक्याचे कार्यवाहक सुनील सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या संख्येने स्वयंसेवक उपस्थित होते. संपूर्ण संचलनासाठी सपोनि. विजय माळी व त्यांच्या सहकाऱ्यांनी चोख पोलिस बंदोबस्त ठेवला होता. यावेळी सोनई व परिसरातील नागरिकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवला.

# गुणवंतांच्या पाठीवर अग्नीपंखची कौतुकाची थाप



**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

अग्नीपंख फौंडेशनतर्फे लोणी व्यंकनाथ येथील श्री व्यंकनाथ विद्यालयात सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात एमपीएससी परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला तसेच दोन महिला खेळाडूंना मदतीचा हात देण्यात आला. या सोहळ्यात एमपीएससी परीक्षेत यशस्वी झालेले सोहेल शेख, किरण मखरे व किरण पवार (मुंबई पोलीस) यांचा उद्योजक प्रकाश कुतवळ व राज्य बाजार समिती संघाचे सभापती बाळासाहेब नाहाटा यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. अध्यक्षस्थानी नागवडे साखर कारखान्याचे संचालक डी. आर. काकडे होते.

यावेळी धावपटू सुरेखा मातणे व विवाहानंतर पोलिस कॉन्स्टेबल होण्याच्या तयारीसाठी मैदानात उतरलेली आदिवासी समाजातील

> **अग्नीपंख फौंडेशनच्या माध्यमातून सीना नदीकाठावरील बाळेवाडी (ता. करमाळा) येथील पुरग्रस्तांना किराणा किटचे तसेच विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. हा उपक्रम फौंडेशनच्या माजी उपाध्यक्ष सुरेखा नानासाहेब शेंद्रे यांच्या हस्ते पार पडला. यावेळी पुरग्रस्त नागरिकांनी फौंडेशनबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. या कार्यासाठी हडपसर येथील मगरपट्टा सिटीतील दानशूर व्यक्तींनी सहकार्य केले.**

रागिनी चव्हाण यांना मदत करण्यात आली. प्रसंगी प्रकाश कुतवळ म्हणाले की, ''भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रेरणेने अग्नीपंख फौंडेशन ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देत आहे. शाळकरी विद्यार्थी आणि खेळाडूंना मदतीचा हात देऊन संस्था प्रेरणादायी कार्य करीत आहे.'' बाळासाहेब नाहाटा यांनी आपल्या भाषणात सांगितले की, ''अग्नीपंख फौंडेशन निः स्वार्थ भावनेने कार्य करीत असून विद्यार्थ्यांमध्ये प्रेरणा व विश्वासाची बीजे पेरत आहे.'' या वेळी डी. आर. काकडे, प्राचार्य बाळासाहेब जठार यांनी मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमाला मनोज जगताप, बंडू खंडागळे, शिवदास शिंदे, भाऊसाहेब वाघ उपस्थित होते. प्रास्ताविक नवनाथ दरेकर यांनी केले, सूत्रसंचालन कार्तिक काकडे व ऋतुजा काकडे यांनी केले तर आभार किसन वऱ्हाडे यांनी मानले.

# अभिनेत्री संध्या : अभिनय, नृत्यांचा सुंदर मिलाफ

आपल्या अभिनय आणि नृत्य कौशल्याने मराठी आणि हिंदी चित्रपट सृष्टीत वेगळे स्थान निर्माण करणाऱ्या जेष्ठ अभिनेत्री संध्या शांताराम यांचे वृद्धापकाळाने ४ ऑक्टोबर रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने चित्रपट सृष्टीची मोठी हानी झाली. अभिनेत्री संध्या म्हणजे अभिनय आणि नृत्य यांचा सुंदर मिलाफ. २७ सप्टेंबर १९३२ रोजी जन्मलेल्या अभिनेत्री संध्या यांचे पूर्ण नाव विजया श्रीधर देशमुख असे होते. त्यांचे वडील रंगभूमीवरील कलाकार होते. त्यामुळे अभिनेत्री संध्या यादेखील रंगभूमीवर काम करू लागल्या. त्यांच्या मोठ्या भगिनी वत्सला या देखील रंगभूमीवर काम करत असत. अभिनेत्री संध्या यांना लहानपणापासूनच नृत्याची आवड होती त्यामुळे त्या नृत्याचे देखील कार्यक्रम करत असत. याच नृत्याने त्यांना चित्रपट सृष्टीत प्रवेश मिळवून दिला. दिग्दर्शक व्ही शांताराम यांनी अमर भूपाळी या चित्रपटासाठी अभिनेत्री संध्या यांची निवड केली कारण हा चित्रपट तमाशाप्रधान होता. यातील मुख्य नायिका ही तमासगिरीन होती. साहाजीकच नायिकेला नृत्य कौशल्याची जाण असणे गरजेचे होते. अभिनेत्री संध्या यांच्याकडे नृत्य कौशल्याची चांगली जाण असल्याने त्यांची या चित्रपटासाठी निवड झाली. या चित्रपटातील तमासगिरणीच्या भूमिकेसाठी अभिनेत्री संध्या यांनी खूप कष्ट आणि नृत्याचे धडे गिरवले. त्यांच्या या कष्टाचे चीज झाले. हा चित्रपट खूप गाजला. यातील गाणीही खूप गाजली. त्यानंतर त्यांना परछाई या हिंदी चित्रपटात खलनायिकेची भूमिका मिळाली या चित्रपटात त्यांनी संध्या हे नाव धारण केले पुढे हेच नाव रूढ झाले. झनक झनक पायल बाजे या संगीतप्रधान चित्रपटातही त्यांनी मुख्य नायिकेची भूमिका साकारली. या भूमिकेने त्यांना अनेक चित्रपट मिळवून दिले. तीन बत्ती चार रास्ता, दो आँखें बाराह हात, नवरंग यासारखे त्यांनी अभिनय केलेले चित्रपट देखील हिट झाले. नवरंग या चित्रपटातील जा रे जा नटखट.... या गाण्यात त्यांनी पुरुष आणि स्त्री अशा दोन्ही भूमिका निभावल्या. त्यानंतर त्यांनी स्त्री, सेहरा, लडकी सह्याद्री की, जल बन मछली नृत्य बिन मजली हे त्यांचे चित्रपट देखील गाजले. अभिनेत्री संध्या यांचा सर्वाधिक गाजलेला आणि लक्षात राहिलेला चित्रपट म्हणजे पिंजरा. या चित्रपटात त्यांनी साकारलेली नायिका अजूनही रसिकांच्या मनात घर करून आहे.



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

समाजसंवाद

अभिनय सम्राट निळू फुले, डॉ. श्रीराम लागू यांच्यासारखे दिग्गज कलावंत असतानाही अभिनेत्री संध्या यांची भूमिका रसिकांच्या लक्षात राहिली. या चित्रपटातील सर्व गाणी गाजली. या चित्रपटाने त्याकाळी विक्रम केला होता. चंदनाची चोळी अंग अंग जाळी हा त्यांचा शेवटचा चित्रपट. हा चित्रपटही गाजला. त्यानंतर मात्र त्यांनी मनोरंजन विश्वातून निवृत्ती स्वीकारली. अभिनेत्री संध्या यांनी राजकमल चित्रपट संस्थेखेरीज इतर कोणत्याही चित्रपट संस्थेच्या चित्रपटात काम केले नाही. शेवटपर्यंत त्या राजकमल आणि व्ही शांताराम यांच्याशी एकनिष्ठ राहिल्या. त्यांनी व्ही शांताराम यांच्याशी विवाह केला. व्ही शांताराम यांच्या त्या तिसऱ्या पत्नी होत्या. त्यांना अनेक पुरस्कार मिळाले. महाराष्ट्र सरकारने त्यांना राज कपूर जीवनगौरव पुरस्काराने गौरविले. अभिनय आणि नृत्य यांचा सुंदर मिलाफ असलेल्या अभिनेत्री संध्या यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

## देव तेथेची जाणावा...







# पोलिसांनी प्रस्थापित केला नवा आदर्श

**राजेंद्र देवढे । विशेष प्रतिनिधी**

**पाथर्डी पोलीस ठाण्याचा पदभार स्विकारल्यानंतर पोलीस निरीक्षक विलास पुजारी यांनी त्यांची वेगळीच प्रतिमा अधोरेखित केली आहे. केवळ कायद्याचा धाक दाखवून गुन्हेगारांचे मतपरिवर्तन होत नाही तर त्यांचे प्रबोधन करुन त्यांना सन्मार्गावर आणण्याचा प्रयत्न करण्यास ते प्राधान्य देतात. फक्त माणसेच नाही तर भूतदयेचे उदाहरण घालून देताना ते कसलाही गाजावाजा न करता शहरातील मोकाट गायींना पुरणपोळ्या खाऊ घालतात. प्रसिद्धी पराङ्.मुख असलेल्या विलास पुजारी यांनी एका पामरास जीवनदान दिल्याने ते आदर्शास पात्र ठरतात.**

खाकी वर्दी म्हटले की समोर येतो एक बेदरकार चेहरा आणि या चेहऱ्यामागचा कठोर अधिकारी...परंतु, या वर्दीच्या आतही एक विलक्षण प्रेमाने ओथंबलेले हृदय असल्याचा अनुभव नुकताच पाथर्डीकरांना आला. येथील पोलीस ठाण्याचे निरीक्षक विलास पुजारी यांनी अशाच उदात्त हेतूने मानवतेचे कार्य तडीस नेऊन एक अनोखा आदर्श प्रस्थापित केला. गेल्या तीन-साडेतीन महिन्यांपूर्वी पाथर्डी शहरात एक मनोरुग्ण आला होता. त्याला आताच मनोरुग्ण म्हणणे म्हणजे त्याच्यावर अन्याय होई -परंतु, थांबायचे तरी नेमके कुठे, हे त्याच्या गावीही नसल्याने त्याने राहुल कोठारी यांच्या ईमारतीतील आरोग्यदीप रुग्णालयासमोर असलेल्या चिंचेच्या डेरेदार वृक्षाखाली बस्तान बसवले. तत्पूर्वी त्याने कचरा गोळा करून त्याच्यावरच स्वतः साठी अंथरुण तयार केले. कालांतराने पाऊस सुरू झाल्यावर तो तेथून दिसेनासा झाला आणि पाऊस उघडताच त्याच रस्त्यावर त्याने एका धोकादायक वळणावर आश्रय घेतला. ही घटना, विलास पुजारी यांच्या कानावर घातल्यानंतर त्यांनी वाहतूक पोलीस नाईक अल्ताफ शेख यांना सांगून त्याला कोठेतरी सुरक्षित ठिकाणी बसवायला सांगितले. परंतु, पाऊस सुरू झाल्यावर त्याने परत त्याच धोकादायक वळणावर मुक्काम केला. शेवगाव रस्त्यावर नेहमी वाहनांची प्रचंड वर्दळ असल्याने पुन्हा तोच प्रश्न नव्याने उपस्थित झाला. याच दरम्यान नवरात्रोत्सव सुरू झाल्यावर, श्री पुजारी बंदोबस्तात गुंतले.या इसमाच्या जीविताला धोका निर्माण झाल्यानंतर दैनिक रयत समाचार, या रयतेप्रती संवेदनशील असलेल्या वृत्तपत्रात कोतवाल तुम्ही मनावर ही केस नाही घेतली..., या शीर्षकाखाली यासंदर्भात बातमी प्रसिद्ध झाली. वृत्तीने कमालीचे संवेदनशील असलेल्या पोलीस निरीक्षक विलास पुजारी यांनी या बातमीची दखल घेऊन काल रविवारी सकाळी या इसमाला, त्या ठिकाणाहून उचलून पहिल्यांदा चिंचपूर रस्तावरील एका वॉशिंग सेंटरवर नेऊन आंघोळ घातली... त्याचे अस्ताव्यस्त वाढलेले डोक्यावरील व दाढीचे केस कापून नवा पोशाख परिधान करवून उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. तेथे त्याला शक्तीवर्धक सलाईन लावून त्याच्यासाठी जे काही करता येईल ते सर्वकाही केले. याकामी उपनिरीक्षक विलास जाधव, अमोल आव्हाड, अक्षय वडते, वाहतूक पोलीस नाईक मधुकर कोकाटे, ज्ञानेश्वर खाडे, मोहटादेवी देवस्थानचे सदस्य आणि नगरपरिषदेचे कर्मचारी रशीद शेख, अंबादास दिनकर, गणेश दिनकर, रवींद्र दिनकर यांनीही मनापासून मदत केली. यानंतर पोलिस कर्मचारी व नगरपरिषद प्रशासनाने या इसमाला आवश्यक उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. सध्या हा इसमाचा जीव भांड्यात पडल्याने त्याला नवजीवन मिळाले. वास्तविक पाहता पोलिसांचे हे काम नसतानाही, पोलीस निरीक्षक विलास पुजारी यांनी केवळ मानवतेच्या दृष्टिकोनातून हे काम केल्याने शहरातील सर्व स्तरांवर त्यांच्याप्रती आदर्श निर्माण झाला आहे. दरम्यानच्या कालावधीत शहरातील काही संवेदनशील नागरिकांनी या इसमास खाद्यपदार्थ देऊन माणूसकीचे उदाहरण घालून दिले होतेच. यानंतर आवश्यक ते कायदेशीर सोपस्कार पार पाडून त्यास म्हणजे संजय यास योग्य त्या ठिकाणी पाठविण्यात येणार आहे. पोलीसांकडे नेहमीच वेगळ्या भावनेने पाहणाऱ्यांच्या मनात आदर्शाची भावना निर्माण झाली आहे. आता संजयला नवजीवन मिळणार असले तरी यामागे पाथर्डी पोलीसांचे योगदान दीर्घकाळ स्मरणात राहील. जे का रंजले गांजले। त्यांसी म्हणे जो आपुले।। तोचि साधु ओळखावा। देव तेथेची जाणावा।। या संत तुकाराम महाराजांच्या अभंगाची प्रचिती याची देही याची डोळा अनुभवास आली, हे मात्र नक्की.

## मिशन माणुसकी : दैनिक रयत समाचारच्या पूरग्रस्त सहकार्य आवाहनास प्रतिसाद

# ९ ऑक्टोबरला संगीत रजनी सहकार्य निधी संकलन मोहिम

## पुरग्रस्तांसाठी द्या मदतीचा हात

**अहमदनगर । रयत समाचार**

जिल्ह्यातील भीषण अतिवृष्टी आणि पुरपरिस्थितीमुळे शेकडो गावे जलमय झाली असून, हजारो कुटुंबांच्या जीवनावर संकटकाळ ओढवला आहे. शेतजमिनी, घरे, जनावरे तसेच शेतमजूर, ग्रामीण कारागिर यांची दैनंदिन उपजीविका सर्व काही वाहून गेल्याने ग्रामीण भागातील जनजीवन विस्कळीत झाले आहे. या पार्श्वभूमीवर 'मिशन माणुसकी या जनउपक्रमातून मानवतेचा दीप प्रज्वलित करण्याचा निर्धार करण्यात आला आहे. या उपक्रमाअंतर्गत संगीत रजनी कार्यक्रमाचे आयोजन गुरूवारी, ०९ ऑक्टोबर २०२५ रोजी सायंकाळी ६:५५ वा. रहेमत सुलतान हॉल, सर्जे पूरा, अहमदनगर-०१ येथे करण्यात आले आहे. या कार्यक्रमातून जमा होणारा निधी थेट पुरग्रस्त रयतेच्या मदतीसाठी वापरला जाणार आहे.

कार्यक्रमाचे आयोजन मखदुम सोसायटी, दैनिक रयत समाचार आणि रहेमत सुलतान फौंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे. आयोजकांनी सर्व सहृदय नागरिकांना आवाहन केले आहे की, सरकारी मदत मिळेल तेंव्हा मिळेल, पण आज माणुसकीची खरी परीक्षा आहे. आपली छोटीशी मदत कोणाच्यातरी जगण्याची मोठी आशा ठरू शकते. नागरिकांना रोख स्वरूपातील मदतीसह किराणा किंवा जीवनावश्यक वस्तूंच्या स्वरूपातही सहकार्य करता येईल. ऑनलाइन देणगीसाठी ९८६०४७७८६९ या क्रमांकावर संपर्क साधावा किंवा दिलेल्या स्कॅनर कोडचा वापर करावा. आपण काही किराणा वस्तू कार्यक्रमस्थळीही जमा करू शकता. कार्यक्रमादरम्यान मिशन माणुसकी मोहिमेच्या प्रारंभापासून सातत्याने मदतीचा हात पुढे करणाऱ्या दात्यांचा विशेष सत्कारही करण्यात येणार आहे. आपत्तीसमयी एकत्र येणे हीच खरी ताकद आहे. चला, माणुसकी जपण्यासाठी पुढे येऊ या.

पुरग्रस्त मदतीसाठी...




# पूरग्रस्त जनतेच्या मदतीसाठी भारतीय कम्युनिस्ट पक्षाचा एल्गार

## ९ ऑक्टोबरला महाराष्ट्रभर रास्ता रोको, सत्याग्रह आंदोलनाची हाक

**मुंबई । रयत समाचार**

महाराष्ट्र राज्यात मागील काही दिवसांत झालेल्या अतिवृष्टी आणि पूरपरिस्थितीने २३ जिल्ह्यांमध्ये हाहाकार माजवला आहे. शंभराहून अधिक मृत्यू, ७६०० पेक्षा जास्त गावे पुराच्या पाण्यात बुडीत, तर तब्बल २९ लाख हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. हजारो जनावरे वाहून गेली असून सुमारे १२ हजारांहून अधिक लोकांना स्थलांतर करावे लागले आहे. तरीही शासन निष्क्रिय आणि असंवेदनशील असल्याचा आरोप करत भारतीय कम्युनिस्ट पक्ष, महाराष्ट्र राज्य किसान सभा, शेतमजूर युनियन आणि आयटक यांनी ९ ऑक्टोबर रोजी महाराष्ट्रभर सत्याग्रह आणि रास्ता रोको आंदोलन करण्याची घोषणा केली आहे. अधिक माहिती देताना किसान सभेचे कॉ. राजन क्षीरसागर सांगितले, पाटबंधारे विभागातील भ्रष्ट कंत्राटदार व इंजिनीअर यांच्या गुन्हेगारी निष्काळजीपणामुळे आणि सरकारच्या महायुतीच्या चुकीच्या धोरणांमुळे अतिवृष्टीचे रूपांतर प्रलयंकारी पूरस्थितीत झाले आहे. धरण व्यवस्थापन, नदी पात्र सर्वेक्षण, पूर्वसूचना आणि नियोजनाच्या अभावामुळे हजारो कुटुंबांचा संसार उद्ध्वस्त झाला आहे. तसेच, 'जलयुक्त शिवार' योजना, नदी-नाले खोलीकरण व रुंदीकरणाच्या अशास्त्रीय कामांवर तब्बल १५ हजार कोटी रुपये खर्चून सरकारने संकटालाच आमंत्रण दिले, असा आरोप पक्षाने केला आहे. प्रमुख मागण्या : पाटबंधारे विभागाच्या निष्काळजीपणावर न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखाली न्यायिक चौकशी आयोग स्थापन करा. पीक नुकसानीसाठी ७०,००० रुपये प्रति हेक्टर, तर माती वाहून गेल्यास २ लाख रुपये प्रति हेक्टर भरपाई द्या. ऊस बिलातील कपात तत्काळ रद्द करा. शेतकऱ्यांच्या सर्व प्रकारच्या कर्जाची माफी लागू करा. सर्व बाधितांना संपूर्ण विमा भरपाई द्या, ट्रिगर व कापणी प्रयोग रद्द करा. पूरग्रस्त शेतकरी, शेतमजूर, पशुपालक, मच्छिमार, कारागीर, छोटे व्यावसायिक यांना ₹१ लाख अर्थसहाय्य द्या. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क माफ करा. पशुधनासाठी प्रति दिन प्रति जनावर ₹३०० चारा अनुदान द्या. पडझड झालेल्या घरांसाठी ₹५ लाखांची मदत व पूर्ण पुनर्वसन करा. शेतमजुरांना मग्रारोहयो अंतर्गत २०० दिवस रोजगार ₹६०० मजुरीसह द्या. केंद्र सरकारचा 'आपत्ती व्यवस्थापन (दुरुस्ती) कायदा २०२५' रद्द करा. या उपाययोजनांसाठी कॉर्पोरेट घटकांवर विशेष कर लावा. या पार्श्वभूमीवर भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे कॉ. अड. सुभाष लांडे म्हणाले, जनतेवर संकट आलं की सरकार गप्प राहतं, आणि जबाबदार यंत्रणा हात झटकते. आम्ही ही अन्यायकारी भूमिका कदापि सहन करणार नाही. ९ ऑक्टोबरला महाराष्ट्राच्या प्रत्येक तालुक्यात रस्त्यावर उतरून सत्याग्रह केला जाईल. पूरग्रस्तांच्या न्यायासाठी होणाऱ्या या आंदोलनाकडे आता संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

# महात्मा फुले विद्यालयाची चमकदार कामगिरी



**अकोले । सतीश पाचपुते**


श्री अगस्ति एज्युकेशन सोसायटीचे महात्मा फुले विद्यालय, सुगाव बु, विद्यालयाने युवा व क्रीडा सेवा संचालनालय, अहिल्यानगर यांच्या वतीने आयोजित तालुकास्तरीय विविध क्रीडा स्पर्धेत आपल्या वैयक्तिक व सांघिक क्रीडा प्रकारातील उत्कृष्ट कामगिरीने शाळेस मान मिळवून दिला. शासनाच्या वतीने दरवर्षी तालुका, जिल्हा, राज्य आणि विभागीय पातळीवर विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन केले जाते. यावर्षीही तालुका स्तरावरील क्रीडा स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडल्या. या स्पर्धेत महात्मा फुले विद्यालयाने खालील यश संपादन केले: फुटबॉल: १७ वर्षे वयोगट मुले प्रथम क्रमांक, १७ वर्षे वयोगट मुली द्वितीय क्रमांक, १४ वर्षे वयोगट मुली द्वितीय क्रमांक व्हॉलीबॉल: १७ वर्षे वयोगट मुली द्वितीय क्रमांक, १७ वर्षे वयोगट मुले तृतीय क्रमांक, १४ वर्षे वयोगट मुले व मुली द्वितीय क्रमांक रिंग टेनिस: मुली जिल्हास्तरावर द्वितीय क्रमांकबुद्धिबळ: आराध्या चौधरी तालुका स्तरावर चतुर्थ क्रमांक, जिल्हा स्तरावर निवडीस पात्र एथलेटिक्स (उंच उडी): अलिना पठाण तालुक्यात द्वितीय क्रमांक राज्य पातळीवर नांदेड येथे आयोजित रिंग टेनिस स्पर्धेत ओम शिवदास देशमुख यांनी विद्यालयासाठी चौथा क्रमांक मिळवून बहुमान प्राप्त केला, तर यश मंगेश देशमुख यांनी राज्य स्तरावर सहभाग नोंदवला. राज्य पातळीवरील निवड चाचणीसाठी श्रावणी महेंद्र देशमुख व खुशी रमेश आवारी यांची निवड करण्यात आली आहे. एसएससी परीक्षेत जिल्हा व राज्य पातळीवरील विशेष कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना अतिरिक्त गुण मिळत असल्याने विद्यार्थ्यांचा क्रीडा सहभाग वाढत असल्याचे चित्र दिसून येत आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थी प्रचंड मेहनत करत, प्रतिकूल परिस्थितीत क्रीडा शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली कौशल्ये आत्मसात करीत यश मिळवतात. संस्थेने वेळोवेळी क्रीडा साहित्य उपलब्ध करून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले आहे. या यशामध्ये विद्यालयाचे क्रीडा शिक्षक दत्तात्रय घुले यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले आहे. विद्यालयाच्या यशाबद्दल सर्व यशस्वी खेळाडूंना संस्था, सचिव शैलजा पोखरकर, कार्याध्यक्ष शिरीष नाईकवाडी, सतीश नाईकवाडी, संदीप नाईकवाडी, मुख्याध्यापक प्रकाश सोनवणे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विठ्ठल शिंदे, सरपंच डॉ. अनुप्रीता शिंदे, उपसरपंच महेश देशमुख, पोलीस पाटील राजेंद्र शिंदे, तसेच सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व पालकवर्गाकडून अभिनंदन व्यक्त केले गेले आहे.

# नगराध्यक्ष पदाच्या आरक्षण सोडतीची उत्कंठा शिगेला

## राज्यकर्त्यांना अच्छे दिन...अनेकांना नगराध्यक्ष पदाचे वेध

**श्रीरामपूर । शफीक बागवान**

जिल्ह्यासह श्रीरामपूर नगरपालिका नगराध्यक्षपदाच्या आजच्या आरक्षण सोडतीची उत्कंठा शिगेला पोहोचली आहे. यामुळे राज्यकर्त्यांना आता अच्छे दिन येण्याचे संकेत आहेत. अनेकांना नगराध्यक्ष होण्याची आता वेध लागले आहेत. राज्यासह संपूर्ण जिल्ह्यातील आणि श्रीरामपूर नगरपालिका नगराध्यक्ष पदासाठीची सोडत आज मुंबईत निघणार आहे. त्याकडे मतदारांसह अनेक राजकीय नेत्यांचे पुढाऱ्यांचे लक्ष लागले आहे. गेल्या पाच वर्षापासून राज्य तसेच जिल्हाभर आणि श्रीरामपूर शहरातही नगरपालिकेवर प्रशासक राजवट कार्यरत आहे. पाच वर्षानंतर होणाऱ्या या निवडणुकीबाबत सर्वत्र निरनिराळे अंदाज वर्तवीले जात आहेत. गेल्या दहा वर्षांपूर्वी झालेल्या निवडणुकीपेक्षा या निवडणुकीचे




वैशिष्ट्य खूप वेगळे आहे.

सर्वच प्रमुख पक्षांची शकले उडालेली असताना होऊ घातलेली निवडणूक रंगतदार आणि बहुरंगी होणार आहे. शहरात काँग्रेस पक्षाच्या बारा निष्ठावंतांनी अलीकडेच भाजपात प्रवेश केला आहे. या माजी नगरसेवक तसेच काही प्रमुख नेत्यांच्या पक्षप्रवेशामुळे भाजपाची शहरात एकीकडे प्राबल्य वाढले असले तरी दुसरीकडे भाजपा स्थापना पासूनचे कार्यकर्ते मात्र भाजपापासून चार हात दूर झाले आहेत. ही बाब निग्लेट करता येणार नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे अजित पवार यांनी आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या एकत्रित लढविल्या जातील अशी घोषणा केली आहे. श्रीरामपूर शहरात मात्र त्यास सुरुंग लागनार आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी पक्षाकडून अविनाश आदिक अनुराधा आदिक निवडणूक लढविणार आहेत. जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे येथे भाजपाचे सारथ्य करतील. पक्ष म्हणून आदिक आणि विखे हे एकत्र येतील. मात्र मुरकुटे यांची भूमिका अद्याप निश्चित नाही. माजी आमदार भानुदास मुरकुटे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेना पक्षात प्रवेश केला आहे. जिल्हा बँकेचे संचालक करण ससाने आणि आमदार हेमंत ओगले यांच्या बरोबर मुरकुटे राहतील का हा प्रश्न आज अनुत्तरीत आहे. मुरकुटे हे नेहमीच विखे आणि आदिक यांच्या विरोधात शड्डू ठोकून उभे असतात. नगरपालिकेसाठी मुरकुटे यांनी यापूर्वी अनेक कार्यक्रमात ओगले ससाणे यांना साथ देण्याचा निर्धार आणि निर्णय जाहीर केला आहे. भाजप काँग्रेस शिवसेना या प्रमुख पक्षांची शहरात सर्वत्र वाताहात झाली असून काँग्रेस सोडून या पक्षांची शहरात दोन दोन गट कार्यरत आहेत. दरम्यान आजचे आरक्षण हे कसे पडते यावर नगरपालिकेच्या निवडणुकीचे भवितव्य अवलंबून राहणार आहे.